International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 15 January – February - 2026

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये पशुधनाचे योगदान

कैलास सोनाजी तांबे[1], डॉ. भागवत सुखदेवराव परकाळ[2]

[1]संशोधक विद्यार्थी, न्यु आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स, महाविद्यालय अहिल्यानगर जि. अहिल्यानगर

[2]मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक, अहमदनगर महाविद्यालय अहिल्यानगर

सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे, पुणे

Corresponding Author - कैलास सोनाजी तांबे

DOI - 10.5281/zenodo.18922849

सारांश:

जगातील कोणत्याही अर्थव्यवस्थेचा विचार करता आपणास शेती क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील स्थान महत्त्वपूर्ण असल्याचे दिसते आणि पशुपालन हा शेती व्यवसायाचा अविभाज्य घटक मानला जातो. त्याचप्रमाणे भारतातील शेती व्यवसाय आणि पशुपालन यांचा परस्पर संबंध आहे यामुळे पशुपालनाला भारतीय अर्थव्यवस्थेत अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. अन्न वस्त्र निवारा या मानवाच्या तीन प्रमुख गरजा पैकी अन्न,वस्त्र या गरजांचे मूळ आपणास शेती व्यवसाय दिसते. हवामानाशी सतत संघर्ष करून निर्माण केलेल्या शेतीमालाची मिळेल त्या भावाने विक्री करून येणाऱ्या पैशावर आपल्या गरजा भागविण्याचा प्रयत्न शेतकरी करत असतो. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी त्यामुळे तो नेहमी कर्जबाजारी राहून आपले जीवन विकसित करू शकत नाही या अर्थव्यवस्थेतून त्याला मुक्त करण्यासाठी पशुपालन हा व्यवसाय की किफायतशीर ठरत आहे.

अहिल्यानगर जिल्हा हा राज्यातील सर्वात मोठा जिल्हा आहे. जिल्ह्यातील बहुतांशी भाग हा बागायती असला तरी एक दुय्यम व्यवसाय म्हणून शेतकरी पशुपालन व दुग्ध व्यवसाय करतात . शेतीची जोड असल्यामुळे जवळपास 70% शेतकऱ्यांकडे विविध प्रकारचे पशुधन आहे. त्यात गायी व म्हशींची संख्या जास्त आहे. शेळी पालनात ही अहिल्यानगर जिल्हा प्रथम असल्याचे दिसून येते. व दुधाचे प्रचंड उत्पादन जिल्ह्यात घेतले जाते.

प्रस्तावना:

मानव आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी निरनिराळे व्यवसाय करतो त्यापैकी कृषी व्यवसायाला अनन्य साधारण असे महत्त्व आहे कृषी हा मानवाचा प्राचीन व प्राथमिक व्यवसाय आहे ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याने कृषी क्षेत्राच्या विकासावरच पशुपालन व्यवसायाचा विकास अवलंबून आहे. भारतातील शेती व्यवसाय हा अर्थव्यवस्थेचा कणाच होय देशातील 50 टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे आणि पशुपालन हे शेतीवरच अवलंबून असल्याने शेती विकास होणे महत्त्वाचे आहे पशुपालन व शेती व्यवसाय एकमेकांना पूरक व्यवसाय आहे पशुपालन शेतकऱ्यांना अधिक की फाईल ठरतो याचे कारण असे की शेतातील कच्चा माल उपयोगात आणता येतो. जनावरांचे खाद्य विकत आणावे लागत नाही जमिनीला सेंद्रिय खतांचा पुरवठा होऊन उत्पन्न वाढते दूध धंद्यामध्ये लागणारे भांडवल व त्यामध्ये धोकेही कमी असतात त्यामुळे पशुपालन अत्यंत पूरक व दुहेरी फायद्याचे आहे.पशुपालनाला भारतीय अर्थव्यवस्थेत अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. पशुपालन व्यवसाय ही शेतीशी निगडित व्यवसाय आहे. शेतीला एक मुख्य जोडधंदा म्हणून त्याकडे पाहिले जाते. भारतासारख्या विकसनशील देशात गुरांपासून नैसर्गिक खते,

शेतीची मशागत, वाहतूक,जळन, व अडीअडचणीत पैसा उभा करण्यात या गोष्टींना प्राधान्य ठेवून दूध व मांस यांना गौण स्थान आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीप्रमाणे पशुधनास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

अहिल्यानगर जिल्हा हा महाराष्ट्र राज्यातील भौगोलिक दृष्ट्या सर्वात मोठा जिल्हा असून तो कृषी आणि पशुधनाच्या बाबतीत अत्यंत संपन्न आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या जिल्ह्याला'सहकार चळवळीचे माहेरघर'असे म्हटले जाते. त्याचा थेट परिनाम पशुपालन आणि दुग्ध व्यवसायाच्या प्रगतीवर झाला. जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा हा मुख्यत्वे पशुपालन व्यवसायावर अवलंबून आहे.

अभ्यास विषयाचे महत्त्व:

संत तुकाराम महाराज म्हणतात"भूमी व जनावरे हे राष्ट्राच्या उत्पत्तीची खिल्लारे"आहेत. अहिल्या नगर जिल्हा हा पर्जन्य छायेखालील प्रदेश येतो. अहिल्या नगर जिल्ह्यामध्ये मुळा धरण,भंडारदरा धरण,निळवंडे धरण हे मुख्य जलाशय आहेत. या जलाशयातील पाणी हे जिल्ह्यातील काही भाग सोडला तर सर्व शेतकऱ्यांना या जलाशयाचे पाणी मिळते. हे पाणी मिळाल्यानंतर शेतकऱ्यांचे विहीर,कुपनलिका शेततळे यांच्या पाणीसाठ्यात वाढ होण्यास मदत होते त्यामुळे या जिल्ह्यांमध्ये पशुपालकांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत चालली आहे म्हणून अहिल्यानगर जिल्ह्यातील पशुधनाचे अनन्य साधारण महत्त्व असल्याचे दिसून येते. अलीकडील काळात पशुधनाचे अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत पशुधनाचे वाढते महत्व लक्षात घेता पशुवैद्यकीय दवाखान्यांना देखील महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात गाई, म्हशी, शेळ्या,मेंढ्या बैल,घोडे,वराहपालन ,कुक्कुटपालन ससे पालन मोठ्या प्रमाणावर करताना दिसून येते.

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मुख्य व्यवसाय शेतीबरोबरच पशुपालन हा देखील आहे म्हणून हा व्यवसाय महत्त्वाचा मानला जातो. पशुपालन हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने एक वरदान ठरलेला आहे यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक विकास होण्यास मदत होते अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये दूध उत्पादनाचे प्रमाण हे दिवसेंदिवस वाढत चालले आहे कारण यामुळे आर्थिक उपलब्धता त्वरित मिळते दुधापासून बनणाऱ्या पदार्थांना मानवी आहारामध्ये खूपच महत्त्व आहे देश विदेश राज्यामध्ये दूध व दुग्धजन्य पदार्थांना खूप मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने पशुपालन व्यवसायाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाराष्ट्र शासन सुद्धा शेतकऱ्यांना पशुपालन करण्यासाठी विविध योजना राबवित आहे त्यामध्ये गोठा बांधण्यासाठी अनुदान,कडबा कुट्टी मशीन घेण्यासाठी,अनुदान गाई म्हशी घेण्यासाठी अनुदान,दूध प्रक्रिया मशिनरी घेण्यासाठी अनुदान या योजनेचा फायदा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर होत आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

1. शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीत पशुधनाचे महत्त्व तपासने.
2. अहिल्यानगर जिल्ह्यातील पशुधनाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
3. पशुधनाचा अभ्यास करून पशुधन वाढीबाबत उपाययोजना सुचविणे.

संशोधनाची गृहीते:

1. अहिल्या नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा आर्थिक व सामाजिक स्तर निम्न आहे.
2. अहिल्या नगर जिल्ह्यातील पशुधन वाढीमुळे शेतीचे उत्पन्न वाढले.

3. शासनाच्या विविध योजनांमुळे पशुपालन व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना चालना मिळाली.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक तथ्य संकलन व द्वितीय तथ्य संकलन यावर अवलंबून आहे.

1. प्राथमिक तथ्य संकलनामध्ये संशोधकाला लागणारी माहिती मिळवण्यासाठी प्रश्नावली,निरीक्षणे मुलाखत याद्वारे तथ्य संकलन केली जाईल.
2. द्वितीय तथ्य संकलन: प्रस्तुत विषयाचे संशोधन करत असताना माहिती संकलित करण्यासाठी तज्ञ व्यक्तीचे लेख, संदर्भ ग्रंथ मासिके वर्तमानपत्रे जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग राज्य शासनातर्फे पशुपाल करण्यात दिल्या जाणाऱ्या विविध योजनांचा तपशील घेतला जाईल.

आर्थिक योगदान:

1. दुग्ध व्यवसाय: अहिल्यानगर हा महाराष्ट्रातील सर्वात दूध संकलन करणाऱ्या जिल्ह्यांपैकी एक आहे सहकारी आणि खाजगी संस्थांच्या जाळ्यामुळे शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध झाला आहे जिल्ह्यात गायी व म्हशी पासून दररोज 32 लाख 33 हजार लिटर दुधाचे संकलन होते सरासरी 30 रुपये लिटर भावाप्रमाणे 9 कोटी 79 लाख 90 हजार रुपयाची दररोज उलाढाल होते..

2. रोजगार निर्मिती: पशुधनामुळे केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे तर दूध संकलन केंद्र प्रक्रिया उद्योग आणि वाहतूक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो.

3. शेळी पालन व कुक्कुटपालन: शेळीला गरिबांची गाय असेही म्हणतात. शेळी बोकडाच्या मटणाचे दर सातत्याने तेजीत आहे त्यामुळे आर्थिक स्रोत चांगल्या प्रकारे होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होताना दिसून येत आहे.

4. वाहतुकीसाठी वापर: बैल रेडा उंट गाढव घोडे खेचर या प्राण्यांच्या साह्याने ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर वाहतूक केली जाते शेतमालाची वाहतूक बी बियाणे खते शेतीची कामे यासारखा फायदा होतो.

5. शेणखत पुरवठा: जनावराचे मूलमूत्र शेण शेळी व मेंढ्यांच्या लेंड यापासून उत्कृष्ट प्रतीचे सेंद्रिय खत तयार होते त्याचा उपयोग शेतीसाठी उत्कृष्ट प्रकारे होतो व याच्या विक्रीतून आर्थिक लाभ होतो.

6. बायोगॅस निर्मिती: बायोगॅस निर्मिती करताना शेण व पाणी विसरण्याचा वापर केला जातो त्यापासून गॅस तयार होऊन त्याचा इंधन म्हणून वापर केला जातो. त्याचाही आर्थिक लाभ होतो.

7. मांसोत्पादन: बोकड वराह कोंबडी यापासून मांस मिळते शेळी बोकडाच्या मटणाचे दर सातत्याने तेजीत आहे यापासून करोडो रुपयांची उलाढाल होत असते त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होताना दिसून येत आहे.

8. लोकर उत्पादन: मेंढीच्या केसांना लोकर असे म्हटले जाते या लोकरी पासून गरम स्वरूपाची कापड तयार होतात. या लोकरीला मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने याचा आर्थिक लाभ मोठ्या प्रमाणावर होतो.

9. कातडी व चमडी: उच्च प्रकारची कातडी चप्पल बूट कंबरपट्टे तयार करण्यासाठी पशू पासूनच मिळतात यापासून आर्थिक लाभ शेतकऱ्यांना होतो.

10. शोभेच्या वस्तू निर्मिती: प्राण्यांची शिंगे व हाडे यापासून शुभेच्छा वस्तू तयार होतात याचाही आर्थिक लाभ शेतकऱ्यांना होतो.

सामाजिक विकास:

1. जीवनमानातील सुधारणा: पशुधनाच्या मिळणाऱ्या उत्पन्नामुळे ग्रामीण कुटुंबाच्या शिक्षण आणि आरोग्य सुविधा चांगल्या प्रकारे मिळत आहे.

2. शिक्षणात सुधारणा: पशुपालनातून मिळणाऱ्या अतिरिक्त उत्पन्नामुळे शेतकरी आपल्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी पाठवू शकत आहे. ज्यामुळे पुढच्या पिढीचे भविष्य सुधारत आहे.

3. सामाजिक प्रतिष्ठा: ग्रामीण भागात अजूनही पशुधनाची संख्या हे समृद्धीचे आणि उच्च सामाजिक दर्जाचे लक्षण मानले जाते.

4. पोषण आणि आरोग्य : स्वतःच्या पशुधनामुळे दूध,गावरान तूप,दूध,अंडी,आणि मांस,यासारख्या प्रथिनानी,समृध्द अन्नाचा पुरवठा होतो. ज्यामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी झाले आहे.

5. महिला सक्षमीकरण: दुग्ध व्यवसाय आणि कुक्कुटपालनात महिलांचा मोठा सहभाग असल्याने त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाले आहे. त्यामुळे त्यांचा कुटुंबात निर्णय घेण्याचा दर्जा उंचावला.

6. सहकार चळवळीचा विकास: अहिल्या नगर जिल्ह्यातील सहकारी दूध संस्था मुळे शेतकऱ्यांचे संघटन वाढले ज्याचा परिणाम त्यांच्या सामूहिक सामाजिक विकासावर झाला.

7. राहणीमानात सुधारणा: उत्पन्नात वाढ झाल्यामुळे पक्की घरे,वाहने आधुनिक उपकरणांच्या वापरामुळे शेतकऱ्यांच्या सामाजिक प्रतिष्ठित वाढ झाली आहे.

निष्कर्ष:

अहिल्यानगर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात पशुधन क्षेत्राचे योगदान अनन्यसाधारण आहे केवळ आर्थिक उत्पन्नच नव्हे तर ग्रामीण भागातील सामाजिक स्थैर्य टिकवण्यासाठी हे क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे आधुनिक तंत्रज्ञान आणि सरकारी योजनांचा अधिक प्रभावी वापर केल्यास या क्षेत्राचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो.

संदर्भ:

1. डॉ.एच डी गुप्ता (1997) - भारतातील दुग्ध व्यवसाय
2. सुकळीकर श्री.बा व खिरे दी. व (1993) आधुनिक गो संवर्धन.
3. डॉ पालम पल्ली हिराचंद व थोरात रवींद्र (2006) पशूंचे महत्त्व व पशुसंवर्धन.
4. जॉन पी. रेफरी (2022) पशुधनापासून असलेले फायदे.
5. तोरडमल विश्वास (2006) पशूंचे संवर्धन व शेळीपालनाचे महत्त्व व जाती.
6. पाटील आशिष व सकटे राजीव (2005) पशु जाती पैदास व आहारशास्त्र.
7. काळे कृ.म.(1998) दुग्ध व्यवसायात गाई म्हशींचे योगदान.
8. घोगरे श्रीकांत (2004) पशूंचे महत्त्व.
9. https://www.maharastra.gov.in.
10. https://www.dahd.gov.in
11. https://www.mahabms.in